# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.०७/१०/२०२४

आरोपी लोकसेवक स्वप्नील वसंत जाधव वय-३० वर्षे पद कनिष्ठ लिपीक, मृद व जलसंधारण कार्यालय उपविभाग रिसोड. रा.एकता नगर रिसोड वाशिम यांना १०००/- रुपयेची लाच स्विकारले प्रकरणात गुन्हा नोंद बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | स्वप्नील वसंत जाधव वय-३० वर्षे पद कनिष्ठ लिपीक, मृद व जलसंधारण कार्यालय उपविभाग रिसोड. रा.एकता नगर रिसोड वाशिम |
| लाच मागणी रक्कम | १,०००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या काकांच्या नावे असलेली शेती नावे करण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाकडून लाभ व मिळकत प्रमाणपत्र तक्रारदार यांना देण्याकरीता आलोसे यांनी तक्रारदारास लाचेची मागणी केली. |
| सापळा अधिकारी | ए.एम.गायकवाड, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदार यांच्या काकांच्या नावे असलेली शेती नावे करण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाकडून लाभ व मिळकत प्रमाणपत्र तक्रारदार यांना देण्याकरीता १,०००/- रु. लाचेची मागणी केल्याची दि. ०३/१०/२०२४ रोजी तक्रार प्राप्त झाली.

दि. ०३/१०/२०२४ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्या काकांच्या नावे असलेली शेती नावे करण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाकडून लाभ व मिळकत प्रमाणपत्र तक्रारदार यांना देण्याकरीता १०००/- रु लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शवील्याचे निष्पन्न झाले.

दि. ०७/१०/२०२४ रोजी सापळा कार्यवाहीचे आयोजन केले असता आलासे स्वप्नील जाधव यांनी तकारदार यांच्या कडून लाच रक्कम १०००/- रुपये स्विकारल्याने आरोपी लोकसेवक यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन रिसोड जि. वाशिम येथे गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. मारोती जगताप, अपर पोलीस अधिक्षक सचिंद्र शिंदे,अनिल पवार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परीक्षेत्र अमरावती,पोउपअधि गजानन शेळके लाप्रवि वाशिम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक ए.एम.गायकवाड व पो.नि बालाजी तिप्पलवाउ तसेच अंमलदार पोहवा. विनोद मारकंडे,विनोद अवगळे,राहुल व्यवहारे,पोना.योगेश खोटे,रवि घरत चापोकॉ नावीद शेख ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.शासकीय लोकसेवकाने किंवा खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन ए.एम.गायकवाड पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं. - १०६४
ए.एम.गायकवाड -९४२३३३८४२४

A.M.Gaikwad

( ए.एम.गायकवाड )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.